
मनोज राजपूत

# ती

## स्वप्नरूपी सत्य



# ती

स्वप्नरूपी सत्य

मनोज राजपूत

ई साहित्य प्रतिष्ठान

# ती

### स्वप्नरूपी सत्य

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ती- स्वप्नरूपी सत्य (कादंबरी)
मनोज राजपूत
१४३, क्रांतीनगर शिरपूर ,जि. धुळे महाराष्ट्र
पिन - ४२५४०५
mob – 9767954100
Email - mnjgirase@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २५ एप्रिल २०१८

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

लेखकाचे मनोगत



सर्व प्रथम सदा सर्वकाळ सर्वांना मनापासून शुभेच्छा, सर्व वाचक, लेखक आणि टीम सर्वांना.. आरोग्य, वैभव आणि नाते संबंधात वृद्धी व्हावी हीच प्रामाणिक इच्छा. आपल्या ई साहित्य प्रतिष्ठान टीमचे मनापासून आभार व्यक्त करतो. आपल्या मराठी भाषेची व्याप्ती वाढावी यासाठी, नवीन लेखकांना लिहिण्यास प्रोत्साहन आणि वाचकांना नवीन विषय तथा विचार वाचण्यासाठी उपलब्ध करण्याच्या या यशस्वी उपक्रमा बद्दल मनापासून आभार.

मला लहान पणापासून वाचनाची आवड आहेच, आणि लिहायला आवडतंच. पुस्तक वाचन करणे आणि त्यासोबत माणसांना वाचणे हे मला मनापासून आवडतं. जितकं पुस्तकं वाचून मनुष्य शिकतो तितकच किंबहुना त्या पेक्षा जास्त लोकांकडून शिकायला मिळतं, असं मला व्यक्तिगत वाटतं कदाचित ते चुकीचं हि राहू शकतं पण माझ्या बाबतीत ते खरं आहे.

मी सध्या पुणे येथे एका सामाजिक संस्थे मध्ये counselor म्हणून कार्यरत आहे. आणि त्यामुळे देशातल्या विविध जागा लोकं आणि ठिकाणी भेट देता येतं. मग

ते विद्यार्थी, पालक, ग्रामीण भागातले, शहरी भागातले, अधिकारी, साधारण लोकं आणि असे सर्वांना भेटता येतं. आणि खूप काही शिकता सुद्धा येतं. कारण ते भेटणं अगदी मनापासून असतं. मानवी स्वभावातले सर्वच गुण, विचार यांचा खूप जवळून संबंध येतो. आणि त्यामुळे ते लिखाणातून बाहेर येतं.

शेवटी कल्पनांना मर्यादा असतातच पण, "जेव्हा कल्पनांना सत्य अनुभवाची जोड मिळते तेव्हा मग खूप काही चांगलं बाहेर येतं." शेवटी पुस्तकापेक्षा माणसंच जास्त शिकवतात, नाही का ?

हि माझी दुसरी कादंबरी आहे मात्र, प्रकाशित पहिले होत आहे.

ज्यात प्रेम.. जे मिळवण्यात नाहीच, अंतकरणात प्रेम घेऊन पुढचा प्रवास करता येतो जो "सात्विक" आनंद देतो, प्रेमात जबरद्स्ती नसतेच आणि नसावीच. अपेक्षा, अपेक्षाभंग, होकार आणि नकार याच्या पलीकडे प्रेम असतं. याचीच हि कथा.

आणि पहिली कादंबरी हि मानवी स्वभावाच्या, स्वप्नांचे आणि निसर्गाचे संकेत त्यातून स्वप्नपूर्ती. आणि एखाद्याने पवित्र मनापासून दुसऱ्यासाठी, दुसऱ्याच्या दुखासाठी मनापासून मागितलेली प्रार्थना जिचा स्वीकार होतो. अशा खूप साऱ्या गोष्टींनी सज्जीत आहे आणि हो प्रेम जे मानवाच्या प्राथमिक गरजांपैकी एक आहे असं मानसशास्त्र सांगतं, ते सुद्धा त्यात येतंच. पुढे "आत्महत्या" देवाच्या सुंदर आणि अनमोल जीवनाचा त्याग तरी कसा करता येऊ शकतो ?? यावर मानसशास्त्रीय पद्धतीने विवेचन, आणि "patriotism" अजून बरेचशा अशा कल्पना आहेत आणि त्या लवकरच पूर्ण होतील.

या पुस्तकाच्या मदतीने खूप साऱ्या वाचकाशी बोलायला मिळेल. वाचक, जेष्ठ लेखक यांनी मला या पुस्तका बद्दल त्याचं मत कळवावं. अगदी टीकाही चालेल कारण त्यातून काहीतरी शिकायला मिळेल आणि त्याचा उपयोग पुढच्या पुस्तकात करता येईल.

सात्विक प्रेमाची कथा प्रामणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे तो कितपत यशस्वी झाला हे मला आता सांगणे शक्य नाही.

धन्यवाद

शुभेच्छा

Be happy

मनोज राजपूत
१४३, क्रांतीनगर शिरपूर , जि. धुळे महाराष्ट्र
पिन - ४२५४०५
mob – 9767954100
Email - mnjgirase@gmail.com

या कथे मधील सर्व पात्रे घटना काल्पनिक आहेत जर चुकून याचा कुठे संबंध आलाच तर तो  निव्वळ योगायोग समजावा. यात कुणाच्या भावना दुखावण्याचा कोणताही उद्देश नाहीच .

`

भाग १

## ती..... स्वप्नरुपी सत्य

अंधार... सर्वत्र अंधार... त्या अंधाराच्या जोडीला नीरव शांतता, मात्र त्या दोघांच्या शांततेच्या नियमांना न जुमानता, बाजूला असलेल्या समुद्रातून हळुवार मात्र वातावरणाला शोभेल असा पाण्याचा आवाज... आणि त्यातच, त्या अंधाराला थोडासा चकमा देत, ढगांच्या मधून... अधून मधून येणारा चंद्राचा प्रकाश, त्या अंधाराला हवा असणारा साथ देत होता.

माझे हात आधीच तिच्या हातात होते, त्या सर्व शांततेत तिथे जरी शांतता असली तरी तिच्या श्वासोछ्वासाचा आवाज मात्र येत होता. अगदी स्पष्ट आणि त्याच्या जोडीला हृदयाचे वाढलेल्या ठोक्यांचा आवाजसुद्धा अगदी स्पष्ट ऐकु येत होता. बाजूला असलेल्या स्कुटीला ती अलगत टेकून उभी होती, मी हि अगदी तिच्या जवळ उभा होतो. त्या थंडीच्या वातावरणात आमच्या एकमेकांच्या श्वासाच्या सहारयामुळे, त्या कडाकाच्या थंडीचा आमच्यावर काहीएक परिणाम होत नव्हता.

किती वेळेपासून दोघांच्या तोंडून एकही शब्द निघाला नव्हता. फक्त अधून-मधून त्या आभाळाच्या मधून येणाऱ्या चंद्राच्या प्रकाशामुळे आमचं एकमेकांच्या चेहऱ्याकडे लक्ष जात होते.

मी घाबरलो होतो आणि ती हि.

हे घाबरणं त्या अंधाराला नव्हतंच किंवा त्या अफाट शांततेलासुद्धा नव्हतं. अर्थात तो अंधार आणि ती शांतता आम्हाला आवडतच होती..

मात्र, कुणास ठाउक माझी अस्वस्थता वाढत होती आणि त्याचा परिणाम म्हणून माझ्या श्वसनाचा वेग देखील वाढत होता... हे मी कितीही नाकारण्याचा प्रयत्न केला तरी ते सत्य होतं. आणि हे सत्य मी तिच्यातसुद्धा पाहू शकत होतो, मात्र दोन्ही स्तब्ध होतो.

जगातील कोणतीच गोष्ट आपोआप होत नाही. पुढाकार हा कुणा एकाला घ्यावाच लागतो. हे मला कळत असलं तरी... "घेतलेल्या निर्णयाचा /कृतीचा परिणाम काय असू शकतो" याच्या चिंतेत मी होतो.

**अर्थात "कृती किंवा निर्णय कोणताच चुकीचा नसतो, ते ठरतं त्याच्या परिणामावरून"**

**"परिणाम योग्य तर निर्णय योग्य आणि परिणाम चुकला तर निर्णय देखील चुकीचा. "**

म्हणून मी घेणार असलेला निर्णय योग्य किंवा अयोग्य यातच मी गुरफटलो होतो.

मात्र सर्व असलं तरी पुढाकार घेणं गरजेच होतं. **"बऱ्याचदा काही गोष्टी दोघांना हव्याशा वाटतात... पण मात्र त्या गोष्टी ची सुरुवात कुणी करावी, बोलावं कुणी यातच बऱ्याचदा त्या अपूर्ण राहतात. "**

म्हणून मीच पुढाकार घेण्याचा निर्णय घेतला. मी हळूच,  माझ्या शरीराची हालचाल केली,  इतका वेळ शांत आणि स्तब्ध शरीर मी अचानक हालचाल केल्याने ती बिथरली असणार आणि त्यामुळे तिची हि हालचाल सुरु झाली होती.

मी तिच्या हातातला हात सोडला आणि अगदी क्षणातच तो पुन्हा तिचा सोडलेला हात घट्ट पकडला,  जणू ती खूप लांब जात होती माझ्यापासून.. मनाला भीती होती तिच्या जाण्याची.

ऐरवी माझे हृदयाचे स्पंदन वाढलेले होते. ते कमी करण्यासाठी,  मी मोठमोठ्याने श्वास घेत होतो. मोठ्याने श्वास घेतला कि थोडा तणाव कमी होतो असं सांगतात,  पण त्याच्या काहीएक फायदा होत नव्हता.

मी तिच्या जवळ जात होतो........ मी तिला काही तरी सांगणार होतो, मनातलं बोलणार होतो.... मनात साठलेल्या ,  दाटलेल्या  सर्व भावनांना वाट मोकळी करून देणार होतो.

Wake up.......

Wake up.....

It’s a new day...

मोबाईल चा अलार्म वाजला आणि मी झोपेतून जागा झालो..

पुन्हा स्वप्न...  मागच्या महिन्यातलं हे तिसर्यांदा आलेलं सारखं स्वप्न.

पण अगदी शेवटच्या क्षणी कोणत्या न कोणत्या कारणांमुळे अपूर्ण राहिलेलं. कधी कोणतं कारण तर कधी काय आणि आज हा  मोबाईल.

“wake up .... wake up .. “म्हणे

जेव्हा उठवायचं असतं तेव्हा तो डब्बा वाजतच नाही. आणि जेव्हा असं काही महत्वाचं असतं तेव्हा आधीच ओरडतो.

परवाच इतकं महत्वाचं काम होतं आणि तेव्हा wake up.... wake up ... तर काय साध ट्रिंग ट्रिंग पण नाही..

इतका संताप येतो ना त्या मोबाईल वर... पण असू दे....

तो तरी काय करेल.. त्याला कुठे काही कळतं... आपण सांगितलेलं तो ऐकतो, स्वतःचं वाढीव काही नाही..

“ वाढीव काम फक्त माणसच करतात, यंत्र नाही !!!!!”

मी उठलो, तेच तेच स्वप्न आणि ते हि अपूर्ण ... काही क्षणाचा विलंब... आणि ते स्वप्न पूर्ण झालं असतं... मात्र तो पूर्णत्वाचा क्षणच येत नाही कधी.

मी सर्व प्रात:विधी आटोपून तयार झालो. आज माझा interview होता. मी interview ची सर्व तयारी केली होती. या आधी मी दोन interview दिले होते. मात्र अजून जॉब मिळाला नव्हता.

“आजकाल शिक्षण घेणं इतकं अवघड नाही जितकं जॉब मिळणं अवघड झालय”.. आणि मिळालाच जॉब तर तो टिकवणं त्याहून अवघड.... हेच सत्य.

पण एक गोष्ट मात्र नक्की “शिक्षण आणि जॉब” हे दोन्ही करतांना त्यात आवड असणं अत्यंत गरजेचं असतं, नाहीतर होतं काय? ?? ,

आपण ‘ शिकतो ’ भलतंच आणि ‘ काम ’ करतो भलतंच.

असो,  असा विचार मनात कायम  असतोच .

रोज सकाळी आई ची हाक  असायची,

“श्याम,  सकाळ झाली बाळा उठ..  तुझ्या college ची वेळ झाली. ”

आणि मग श्याम म्हणजे मी आरामात उठायचो,  अंथरुणावर  बसून,  सर्व जगाचं tension बाजूला ठेवून आपला आरामात निवांत उठायचो आणि उशिराने सर्व गोष्टी करायचो. मग ते college असो वा इतर कोणत्याही.

पण आज तसं नव्हतं ....  आज उठवायला,  “ श्याम उठ “ अशी आईची हाक नव्हती.

आणि उशिर झाला म्हणून काही फरक पडत नाही,  असा विचार करण्याचं धैर्यसुद्धा नव्हतं.

इतका बदल कसा होतो??   नाही कळत !!

पण बदल महत्वाचाच असतो.

college ला असताना वेळ,  शिस्त यांचा दूर दूरपर्यंत काही एक संबध नव्हताच. वेळेवर lecture ला जाणे हा तर मोठा गुन्हाच ...

मात्र,  अगदी lecture सुरु झालं आणि

“ may I come in sir”???

असं नम्रपणे चेहऱ्यावर स्मित हास्य करुन विचारणं, आणि त्यावर प्राध्यापकाची प्रतिक्रिया,

”या” !!!!!!!!!@@@@@

“ आता एखाद्याला इतक्या नम्रपणे आणि कमरेतून वाकून विचारलं आणि समोरच्याने नाही म्हणावं. ”

शक्य आहे का ते? ?? ...

मात्र, हे सर्व मी जाणून करायचो, क्लास ला मुद्दाम उशिरा जाण्याची एक वेगळीच मजा असते.

सर्व सुरळीत सुरु असतं, सर्व विद्यार्थी क्लास मध्ये बसले असतात आणि आपण मध्येच जायचं, सर्वांचं लक्ष आपल्याकडे गेलं नाही, तरच नवल...

असले काम मात्र college संपल्यावर चालत नाहीत, अजिबात नाही. interview ला वेळेच्या अगोदर जाणे गरजेचे असतं, त्याहून जॉब मिळालाच तर, कामाला वेळेवर जाणे बंधनकारकच.

असे गंभीर विचार माझ्या मनात येतात, हे आता कुणाला सांगितलं तर.. ऐकणाऱ्याला त्यावर विश्वास बसणारच नाही.

” गंभीर आणि श्याम “

परस्पर विरोधी गोष्टी ....

आणि त्यातल्या त्यात '"मुली >> प्रेम"  हा तर अवघडच विषय ..  म्हणजे माझ्यासाठी तरी तो अवघडच होता.

इतर गोष्टीत सर्वत्र पुढे,  अगदी भांडणापर्यंत,  मात्र मुलीचा विषय आला कि,  गाडीचा रिवर्स गेअर टाकून  गाडी मागे.

का,  कुणास ठाऊक ...  मुलीं समोर मी घाबरतो,  असं बोललं तर त्यात काहीच संकोच मला वाटणार नाही. कारण ते सत्य  होतं.

प्रेमाचा एकही अनुभव नसलेला मी,  पण मात्र हे स्वप्न ...  जे बऱ्याचदा येतंय.  अगदी विरोधी वाटत होतं. वाटत होतं म्हणण्यापेक्षा,  विरोधीच होतं ते.

मुलीसोबत क्वचित बोलणारा मी,  स्वप्नात  एका मुलीसोबत रात्रीला, outing,  night walk,  एका समुद्र काठी... !!!!...  हे माझ्याने शक्य नव्हतंच.

**पण स्वप्न ,  म्हणजे? ??** ...

**मनातल्या सुप्त भावनांचं प्रतीबिंब  असं मानसशास्त्र  सांगतं.  ..**

**मनातल्या अपूर्ण भावना या स्वप्नाद्वारे  बाहेर येतात असंही मानसशास्त्र  सांगतं.**

असं जर असेल तर मग माझ्या मनातल्या भावना थोड्या वेगळयाच होत्या.

"एक स्वप्न मी उराशी बाळगलेलं होतं. ते स्वप्न,  ती कल्पना या आधीच्या स्वप्नापासून वेगळी  होती,  अगदी वेगळी..

तसा प्रेमाचा, मुलींचा आणि एखाद्या मुलीबद्दल आकर्षणाचा आजपर्यंत संबध, माझ्याशी आला नव्हता. पण प्रेम....

प्रेम असावं, विद्यार्थ्याच्या जीवनात तर ते रोजच होत असतं आणि रोज जातंसुद्धा. **आता रोज होणाऱ्या प्रेमाला काय नाव द्यावं.. मला नाही सांगता येणार**.. पण तरी प्रेम 'अप्रतिम' अनुभव असला पाहिजे.

मी अजूनपर्यंत तरी त्या भानगडीत नव्हतोच पडलो, मात्र एक कल्पना माझ्या मनात कायम येत होती .. ती का येत होती मला सांगता येणं शक्य नाही . कारण तसा प्रेमाचा आणि माझा अजूनपर्यंत काहीएक संबंध नव्हताच. "

पण मला एक बाब नेहमी वाटायची.

" असं घडावं कधीतरी" @!#!.

**" ती समोरून यावी आणि तिला पाहताच क्षणी मी स्वतःला विसरून जावं. तिच्या सौंदर्याचं, तिचं येणं माझ्या सकट सर्वत्र आजुबाजूच्या परिस्थिती वर परिणाम कारक असावं. " तिचं येणं, तिचं हसणं, तिचं बोलणं सर्वच अगदी मनाला स्पर्श करणारं.**

**तहानलेल्याला पाणी मिळाल्यानंतर तहान पूर्तीचा जसा अनुभव येतो. अगदी तसा किंबहुना त्यापेक्षा जास्त समाधानाचा अनुभव तिच्यामुळे यावा मात्र, यात कुठेच वासनेचा अथवा भोगाचा मनाला स्पर्श नसावा.**

**कारण "खरा आनंद मिळवण्याचं साधन मला माहित होतं. "**

**पावित्र्याचं रूप मला माहित होतं....**

**तिचं येणं इतकं परिणाम कारक असावं....... कि एखाद्या मुक्या माणसाला, ज्याने आजपर्यंत एकही शब्द उच्चारलेला नाही अशा माणसाला आवाज मिळावा, आणि फक्त इथेच न संपता आयुष्यभर त्या आवाजाची त्याला आठवण असावी..**

**"अपूर्णत्वाला पूर्णत्वाची जोड ... "**

**प्रत्येक अपूर्ण गोष्टीला योग्य ती जोड देऊन पूर्ण केलं जातं. तशीच "ती" मला पूर्ण करणारी असावी आणि "मी" तिला.**

**"देवाची सर्वात छान रचना हा नवा दिवस फक्त आणि फक्त तिच्याने सुरु व्हावा. "**

विज्ञानाचा एक नियम मी वाचला होता , "एखाद्याने एखाद्याला काही न सांगता. त्यांच्यात संभाषण होतं, होऊ शकतं".. त्यासाठी त्यांची तरंग लहरी एकमेकांशी जुडाव्या लागतात, असं मी वाचलं होतं आता त्यात खरं किती ते माहित नाही मला.

पण असेल खरं !!! तर घडावं असं !!!....

आणि दोघांच्या बोलण्यात 'वेळ' कसा जावा हे समजूच नये.....

**" वेळ "....**

अरेच्या , अचानक माझं लक्ष समोरच्या भिंतीवर असलेल्या घड्याळावर गेलं, जी तिचं काम अगदी प्रामाणिक पणे करत होती. अगदी, वेळ न वाया घालवता .. आज माझा interview होता आणि वेळ या प्रेमाच्या गोष्टीचा विचार करून जात होता. मला माहित होतं, interview ला याबद्दल काहीच नाही विचारणार आहेत.

मी तयार झालो, माझ्या मित्राने मला interview साठी काही टिप्स दिल्या त्या ऐकून मी निघालो. निघण्या अगोदर न चुकता सवयी प्रमाणे देवाचे दर्शन घेऊन देवासमोर नतमस्तक होऊन मी निघालो.

पण हात जोडून दर्शन घेतांना देवाकडून काही न मागणं हा भाव माझा आधीपासूनच आहे.

**देवाकडून काही मागावं यावर माझा विश्वास नाही. हा, मात्र मागितलंच ... तर ते दुसऱ्यासाठी असावं** .. यावर मी विश्वास ठेवतो .

कारण सरळ आहे, मला जे हवंय ते देवाला माहित असणारच ..

मग ज्याला, ' आपल्याला काय हवंय हे माहित असेल, त्याला ते सांगणं किती योग्य असणार ".

आणि आणखी एक, "मागितलच तर ते दुसऱ्यासाठी",

हे या साठीच कारण, "त्यामुळे निस्वार्थ बुद्धीत वाढ होते. "

तसंच मी काही न मागताच रूम मधून निघालो.

मी ठाणे या शहरात राहत होतो, आणि interview हा CST म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल या ठिकाणी होता. हे दोन्ही ठिकाण भारतातल्या सर्वात समृद्ध .. अर्थात सर्वांगाने समृद्ध शहर... ' मुंबईत ' होते.

लहानपणा पासूनंच आकर्षण असलेलं शहर म्हणजे मुंबई हेच होतं. आणि तिची ती धावपळ, तिचं सौंदर्य , तो समुद्र किनारा तिथं रोज होणारा सूर्यास्त प्रमुख आकर्षण " गेट वे इंडिया " आणि अजून खूप काही.

हे सर्व मी ऐकून होतो, आणि पाहीलच तर कुठे तरी movie मध्ये पाहिलं होतं.

मला अजून थोडेच दिवस झाले होते मुंबईत येऊन, म्हणून जास्त काही माहित नव्हतं.

मित्राला सर्व व्यवस्थित विचारून मी इच्छुक ठिकाणी पोहचलो होतो.

interview च्या जागी म्हणजे एक भव्य दिव्य इमारती मध्ये असलेल्या ऑफिस च्या समोर मी पोहचलो, गावाकडून येणाऱ्या प्रत्येकाला ती इमारत पाहून चक्कर आलेच पाहिजे, इतकी ती भव्य होती. ऐरवी असे इमारत पाहण्याची सवय डोळयांना नसल्यामुळे ते त्या ऑफिसकडे पाहतच होते. पण इमारत मोठी, शहर मोठं, लोकं मोठी, या गोष्टी मला त्रास देऊ शकणाऱ्या नव्हत्याच.

कारण मला माझ्या आजोबांचं एक वाक्य आठवत होतं. नाना सांगायचे, नाना म्हणजे माझे आजोबा. मेहनत, कठोर परिश्रम, वयाच्या शेवटपर्यंत काम, दोनदा पायांचा accident होऊनसुद्धा दररोज २ km च्या ४ फेऱ्या सहज करायचे .. जर मला आता कुणी सांगितलं तर माझ्यानेसुद्धा सहजा सहज ते अंतर रोज पार होईल यात शंका आहे. पण ते रोज करायचे... अगदी कंटाळा न करता.

कुटुंबासाठी कुटुंबाच्या सर्व गरजा अगदी निट आणि प्रामाणिक पणे काम करून त्यांनी पूर्ण केल्यात.

**खूप छान वाटतं जेव्हा कुणी संपूर्ण जीवन प्रामाणिक पणे काम करून घालवतं, “नाहीतर लबाड काम करून जीवन जगणारे हरामखोरांची कमतरता नाहीच या जगात “..**

पण नाना.. प्रामाणिक ...

ते सांगत मला, **“जे काम करायचं आहे ते जर आपल्याला उत्तम येत असेल तर... जागा, शहर, लोकं यांची भीती माणसाला असुच शकत नाही ”**.

म्हणून जे काम करायचं त्यावर लक्ष दे, “ कुठे करणार, कुणासोबत, कुणासमोर करणार या शुल्लक गोष्टी. ”

म्हणून मला चिंता नव्हतीच, त्या इतक्या मोठ्या ऑफिस ची अथवा इमारतीची.

मी अगदी वेळेतच पोहचलो होतो ऑफिस च्या reception ला मी माझा resume दिला. आणि interview साठी आलो असल्याची माहिती दिली.

interview ची सुरुवात झाली, माझा नंबर बहुतेक उशिराच होता.

माझं नाव आलं

“ Mr. श्याम “

मी आत गेलो..

may i come in sir,

तिथे बसलेल्या साहेबा ने होकार दिला, मी आता गेलो.

समोर पाच वयस्क मंडळी बसली होती

त्यांनी मला बसण्याची सूचना केली.

so, Mr. श्याम..

त्यांनी माझा resumeकडे निरखून पाहून, विचारलं.

**Interviewer** : Mr. श्याम

“ you have done science as well as arts. ”

What should we think about your fluctuated education path? ??

मी : Sir, its not like that,

Can I speak openly?

**Interviewer** : Yes sure, u can !!.

मी : Actually, I could have hidden my other degree which I have taken from arts side. But I didn’t do this because I know, this organization needs employee, those will work for making really change in society , isn’t it?

**Interviewer:** But why you need to do both degree? I didn’t get what is the exact reason .

मी : yes sir, actually I have done my graduation from science, but I want to work for people, and I thought, I can do

my work well, if I studied about people and there problem. so I did education from arts.

Because of that, I can do my job more than good and effective.

And I will really try to use this skill, ( both science and arts) to make great change in society. which is dream of that organization and mine too

**Interviewer** : Ok, thank you Mr shyam.

You may go now, we will inform you

thank you

मी : Thank you sir,

great meeting to you all.

and I would really like to work with this organization.

मी बाहेर आलो आणि समोर असलेल्या खुर्ची वर बसलो. Interview संपला. मला वाटतं इथे आलेल्या सर्वात माझाच Interview इतका कमी वेळ झाला असावा.

आता याचा अर्थ काय असावा मला नव्हता कळत.

मी माझ्या एका ओळखीच्या परंतु यात समजत असलेल्या मित्राला फोन केला.

तो म्हणाला . याचे दोनच अर्थ असू शकतात , **एक तर त्यांना जे हवंय ते तेवढ्या वेळेत त्यांना मिळालं असेल, किंवा जे नको तेसुद्धा मिळालं असेल. !!!!!!!**

मग मला वाटलंच त्यांना जे नको आहे तेच मिळालं असेल.

गेला हा पण job. !!??

मी विचार करत बसलो होतो, मी थोडा नाराज, थोडा अस्वस्थ, निराश .....

असा विचार करत असताना माझी नजर अचानक समोर गेली. समोरून एक मुलगी आली, सुंदर अप्रतिम सुंदर !!!! क्षणाचा हि विलंब न करता माझ्या मनातून शब्द बाहेर आलेत.

ती घाईत येऊन समोर बसली, थोडी दमलेली, घाबरलेली .. होटांवर काही तरी पुटपुटत होती ..

दोन्ही हातातले बोट एकमेकांवर ठेवत काहीतरी विचार करत होती.

( हाताचे बोट म्हणजे अंगठ्या जवळील पहिला बोट मधल्या बोटांवर ठेवत ती काही तरी स्वताशीच पुटपुटत होती )

**ती घाबरलेल्या अवस्थेत अगदी सुंदर दिसत होती कारण "त्या वेळेत जे होतं ते तिचं खरं रूप होतं, त्यात बनावट काहीच नव्हतं. कदाचित तिला माहित नसावं, तिच्या चेहऱ्यावर येणाऱ्या केसांमुळे (लटा) तीचं सौंदर्य अजून वाढत होतं (खुलून दिसत होतं), पण ते तिला कळतच नव्हतं. "**

**आणि ते तिला माहित नव्हतं हेच चांगलं होतं, कारण जर तिला माहित झालं असतं, तर त्या सौंदर्याचा तिला कदाचित गर्व झाला असता आणि "सौंदर्यात किंवा बुद्धीत गर्व मिसळला तर ... ते भेसळ तयार होते. आणि भेसळ किती चांगलं आरोग्यासाठी आणि नात्यासाठी हे आपल्याला चांगलंच माहित आहे". म्हणून तिला ते माहित नव्हतं हेच योग्य होतं.**

तिने त्या लॉबी मध्ये प्रवेश केला तोपर्यंत मी निराश, हताश, चिंतेत बसलो होतो. परंतु ती आल्यानंतर वातावरण अगदी बदलंच. मी आता प्रसन्न अनुभव करत होतो.

तिथे असलेल्या आधीच्या एक सुंगधीत सुगंधाचा अनुभव , ती येईपर्यंत मला जाणवत नव्हता. मात्र आता तो सुंगध, वातावरण सुगंधित करत होता.

तिचं नाव Interview साठी पुकारण्यात आलं, ती गेली. मात्र वातावरण आणि मला प्रसन्न करून गेली. **पहिल्यांदा मी एखाद्या मुलीकडे इतका वेळ आणि आजूबाजूची सर्व परिस्थिती विसरून बघत होतो . मी सर्व भान विसरलो होतो.**

**ती एक स्थिती जी " काही हवं आणि काहीच नको"** यांच्यातली असते. तशा स्थितीचा मी अनुभव घेत होतो. मी इतका गुंतलो होतो कि तिचं नाव घेतलं गेलं तेव्हा, ते शब्द माझ्या कानावर आले असले तरी, त्यांचा अर्थ मी समजू शकलो नव्हतो. ती गेली होती मात्र एक नवचैतन्य निर्माण करून .

आता मी ऑफिसपासून जवळच असलेल्या मुंबईतल्या एक प्रसिद्ध ठिकाण "गेट वे ऑफ इंडिया" पाहण्यासाठी निघालो, मी त्या ठिकाणी पोहचलो. ती शानदार जुनी इमारत त्या समुद्राच्या लाटा आणि ती निरव शांतता...

त्या समुद्राच्या कडेला असलेल्या कठड्यावर मी बसून होतो अगदी शांत, निवांत आणि आनंदी.

ती तरुणी खूप सुंदर होती, असं नव्हतं कि, **मी या आधी इतकी सुंदर मुलगी पाहिली नव्हती, ती सुंदर होती, अप्रतिम सुंदर.**

**मला तिच्याशी मैत्री करायची होती, मला तिच्याशी बोलायचं होतं, बोलतच राहायचं होतं,**

**"क्वचितदा मनात एखाद्या विषयी अशी भावना येते" .. हा, एक गोष्ट मात्र नक्की होती .**

**" या सर्व प्रकारात नेत्रसुखाचा अजिबात संबंध नव्हता ..**

**तिला बघतच राहण्यात नेत्रसुखाचा अजिबात संबंध नव्हता ..**

**तिच्याशी बोलत राहण्यात कुठलाही स्वार्थ नव्हता. या सर्वात, कुठेच वासनेचा माझ्या हृदयाला स्पर्श हि नव्हता.**

**हो मात्र तिच्याशी जवळीक करावी हे मला हृदयाच्या खोल भागातून वाटत होतं.. ते हि तिच्या सहमतीने, जबरदस्ती, देखावा अथवा इतर काही अजिबात नको होतं. तिच्याशी जवळीक... ती हि दोघांच्या मनातून.**

**आयुष्यात एखादा व्यक्ती जोडावा ज्याच्यावर आपण आपल्यापेक्षा जास्त विश्वास ठेवावा..**

**एखादी व्यक्ती असावी, जिच्यासाठी सदैव प्रार्थना निघावी .. तिच्या आनंदा साठी ... भल्यासाठी....**

**जिची काळजी करतच रहावी असच वाटावं.**

**हे सर्व मला तिच्याबद्दल वाटत होतं. अगदी निस्वार्थपणे**.

असा विचार करत मी त्या किनारी बसलो होतो .

मी शांत होतो, पण आनंदी.

मी बसलो होतो .. मात्र एक गोष्टीची कमी होती.

**"हातात चहाचा कप होता . "एक" ..**

**असाच आणखी एक हात हवा होता, चहाचा कप पकडलेला**.

मात्र सध्या चहा पकडलेला एकच हात होता आणि चहाचा कप हि एक ... मी चहाचा आणखी एक कप घेऊन बसलो होतो .. दुसऱ्या हाताची वाट पहात...

जर तिला मी काही सांगायचं ठरवलं, तर ते याच ठिकाणी सांगेल !!!!!!!!!!.

आज दिवस भर मी तिच्याच विचारात होतो, अगदी या क्षणीसुद्धा.

मी समोर एकसारखं बघत होतो आणि त्या शांत संध्याकाळी .. थोडा अंधार थोडा उजेड अशा वातावरणात मी समोरून तिला येताना पहात होतो. ती माझ्या मनात इतक्या खोलपर्यंत पोहोचली होती कि आता या क्षणी ती समोर नसताना देखील, मी तिला समोर पाहू शकत होतो, अगदी स्पष्ट पणे....

तिची नजर माझ्या नजरेला भिडली..

आणि गालात हल्कसं  मात्र  हृदयाला भेदून टाकेल असं स्मितहास्य  करत ती  माझ्याकडे येत होती.

मी झोपलो नव्हतो मात्र तरी असं स्वप्न  तेही अगदी स्पष्ट .

ती हळू हळू माझ्याकडे येत होती .  मी फक्त तिच्याकडे पहात होतो. कारण ते सत्य नव्हतं,  कल्पना होती,  म्हणून माझ्या कडून काहीच प्रतिक्रिया अपेक्षित नव्हती.

मात्र ती कल्पना जरी असली तरी सत्यापेक्षा कमी नव्हती.

अगदी,  थोड्याच वेळेत ती माझ्यापर्यंत पोहोचली आणि समोर असलेला चहाचा कप घेत बोलू लागली.

मी आपला फक्त बघतच होतो ..

hey hello,  ...

कसा झाला interview?  ??

चांगलाच झाला असणार !!!!!!! नाही का??   ती म्हणाली.

काही क्षण मी थबकलोच,  हि काही कल्पना नव्हतीच,  स्वप्न नव्हतं . ती माझ्या समोर होती,  **“वाट पाहणाऱ्या चहाचा कप हातात घेऊन” @@@@@**

**मी वाट पहात असलेल्या चहासाठीचा  दुसरा हात. @@@@@**

hey hello,   ती पुन्हा उच्चारली  ....

कदाचित तिने मला तिथे ऑफिसला पाहिलं असणार.

oh hi... मी बऱ्याच वेळेनंतर उत्तरलो.

छान.. छान ... छान झाला interview.

तिला समोर बघून पुढे काय बोलावं हेच मला कळत नव्हतं.

आताच काही क्षणा पूर्वी मी मनात तिच्याबद्दल किती, किती विचार करत होतो, मात्र ती समोर आली आणि मी सर्वच विसरलो....

ती बोलत होती .. मी फक्त ऐकत होतो,

फक्त तिच्या बोलण्याला होकार आणि नकाराच्या प्रतिक्रिया देत.....

बोलण्यात वेळ कुठे गेला ते समजलंच नाही.

मी तिला पाहिल्याक्षणी माझ्या मनाने तिच्याबद्दल इतकं का अतुर व्हावं?

का माझं मन तिच्याकडे इतकं आकर्षित व्हावं?

हे आता तिच्याशी बोलल्या नंतर कळत होतं.

बराच वेळ झाल्यानंतर ती गेली, मात्र ती असेपर्यंत वातावरण अगदी सुखद आणि आनंदी करून ती गेली होती.

म्हणून मगाशी मी व्यक्त केलेली इच्छा चुकीची नव्हतीच ...

जर तिच्या सोबत असलेले क्षण मी प्रसन्न असेल .....

जर तिच्या सोबत घालवलेला काही क्षण, ते हि सर्व आनंदात ....

मग जर ...

ती कायम सोबत असेल तर ... तर ....

मी तिच्या प्रेमात पडलो होतो हे आता नवीन काही सांगण्याची गरज नव्हती .

पण...पण.. या प्रेमाची व्याख्या थोडी वेगळी होती .

प्रेम एकमेकांसोबत असण्यातच नाही, तर एकमेकांच्या मनात असण्यात असणार.

प्रेम म्हणजे फक्त मिळवणेच नाही ...

असो, या जगात प्रेमाची व्याख्या मग ते कोणतंही प्रेम असो ते अवलंबून असतं **काहीतरी मिळण्यावर, अपेक्षेवर, गरजेवर मग ते काहीही असो** ... पण

**ते असलं पाहिजे, तुम्ही कसे आहात यावर. तुमच्या कडून काय मिळणार यावर नाही. "मात्र सर्वच नाते अपेक्षेवर आधारलेली नसतात, " हे देखील महत्वाचं,**

**"अपेक्षे रहित प्रेम करता येतंच पण ते करणं इतकं सोपं नाहीच"**.....

फक्त तत्वज्ञान सांगत बसणं याला हि प्रेम नाही म्हणणार .... @@@@@@

आता ती गेली आणि मी बसून होतो.

शेवटी "भेटू या " एवढे वाक्य बोलत ती निघून गेली ,

मात्र, "भेटू या "

या शब्दात खूप आत्मविश्वास होता.

ती गेली तिला जाऊन खूप वेळ झाला होता,  ती गेल्या नंतर माझ्या लक्षात येत होतं,  मी तिला तीचं नाव देखील विचारलं नव्हतं,  तिचा फोन नंबरसुद्धा घेतला नव्हता,  हि आमची पहिली भेट होती आणि  कदाचित शेवटची ठरणार होती.

कारण माझी  interview मध्ये निवड होण्याची सुत्राम शक्यता नव्हती. आणि त्यामुळे आमची पुन्हा भेट कशी ...? ?? ?? ??

मी रूम वर पोहोचलो ... अत्यंत आनंदी आणि मनात खंत घेऊन...

आनंदाचे कारण तर ती तरुणी होती आणि खंताचंसुद्धा...

>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>>

# भाग २

सकाळ .. प्रत्येक नवीन दिवस काहीतरी नवीन करण्यासाठी असतो. अशा या नवीन आणि काहीतरी नवीन करण्यासाठी पोषक असणाऱ्या दिवसाची सुरुवात झाली. सर्व चांगल्या गोष्टींची आठवण करत या दिवसाची सुरुवात झाली होती. आणि या चांगल्या गोष्टीत तिची आठवण न येणं म्हणजेच आश्चर्य ...

तिचं नाव मला माहित नव्हतं, तिचा कुठल्या हि प्रकारचा contact नंबर माझ्याकडे नव्हता पण त्या गोष्टीचा काहीच फरक नसणार होता. कारण, ती माझ्या मनात होती,

**अगदी समुद्रात साठलेलं पाणी असतं तसं, कमी होण्याचा प्रश्नच येत नाही, सूर्य किरणांमुळे थोडं पाणी कमी जरी झालं, तरी पाऊस, नद्यांच्या मार्गांनी पुन्हा समुद्राला मिळणारच**.

तशीच ती माझ्या जवळ जरी नसली तरी माझ्यातच होती. असा समुद्र ... जो शांत तर अजिबात नाहीच, कायम हालचाल करणारा, तशीच ती माझ्या मनात होती आणि माझ्या मनातल्या समुद्राला कायम ढवडत होती.

आज सकाळी मला, मी दिलेल्या interview बद्दल फोन आला होता. माझी निवड झाली होती. आणि दोन दिवसात joining करायचं होतं. मला आनंद होत होताच, कारण जॉब मिळाला होता आणि अर्थातच आता तिला भेटण्याची शक्यता वाढली होती.

मी सर्व लागणाऱ्या  गोष्टीची पूर्तता करून,  job साठी गेलो . माझं काम हे कंपनी च्या CSR( Corporate Social Responsibility) या विभागात होतं, समाजाचं आपल्याला काही देणं लागतं त्यासाठी त्यांना योग्य आणि गरजेच्या गोष्टींची पूर्तता आपल्या परीने शक्य तितक्या प्रामाणिकपणे करण्याचं काम, ज्यासाठी समाजाबद्दल जाणीव लागते,  मनात लोकांबद्दल प्रेम असावं लागतं ते हि मनापासून,  बनावट अथवा देखावा नकोच,  आणि तेव्हाच काम आणि लोकांचा फायदा होऊ शकतो. नाही तर करायचं म्हणून करायचं तर मग झालं कल्याण... !!!!!!!

अगदी मजेचं काम होतं,  काम कोणतं चांगलं असा प्रश्न आलाच तर उत्तर काय असलं पाहिजे ..? ??

“काम करता करता मला तर आनंद मिळेलच मात्र त्या सोबत लोकांना देखील आनंद मिळाला पाहिजे. ”

“काम तेच ज्यात काही तरी केल्याचं समाधान मनाला  मनापासून मिळतं, आणि मग बाकी गोष्टी ज्या गरजेच्या आहेत त्या आपोआप येतातच कि त्यात. ”

पण एक गोष्ट नक्की मात्र,  समाज सेवेच्या क्षेत्रात खऱ्या अर्थाने काम करण्यासाठी त्या व्यक्तीला निस्वार्थी असावंच लागतं.

माझा पहिला दिवस होता कामाचा,  ऑफिस ला प्रवेश केल्याक्षणी सर्वात आधी माझे  डोळे त्या तरुणीला शोधात होते,   तिला पाहण्यासाठी ते आतुर झाले होते. इतके दिवस त्यांनी तिला पाहिलेले नव्हतं ऐरवी आशाच सोडली होती. आणि आता आशा पूर्ण होणार असं वाटल्यावर ते अधिक अधीर झाले होते. एखादी मनापासून आवडणारी व्यक्तीबद्दल असा विचार करणे यात चुकीचं नव्हतं.

**“या जगात आजूबाजूला सर्वत्र स्वार्थी प्रवृत्ती ची वाढ होत असताना अशा एखाद्या मनापासून निस्वार्थी व्यक्ती ने सोबत असावं असं वाटणं यात काहीच गैर मला तरी वाटत नव्हतं. ”**

आणि तीच अपेक्षा मी व्यक्त करत होतो, मला याची मुळीच पुरे पूर कल्पना अजून नव्हती, कि ती तरुणी अगदी तशीच आहे, पण पहिल्या भेटीत ती तशी जाणवली होती.

पण मनाने जेव्हा एखाद्याबद्दल पहिल्यांदा असं वर्तवावं म्हणून त्यावर माझ्या मनाने विश्वास ठेवला होता.

माझ्या दिवसाची सुरुवात झाली होती. **माझ्या डोळयांना अपयश आलं होतं, ते तिला शोधण्यात अपयशी ठरले होते. मात्र त्या अपयशामुळे ते निराश मुळीच झाले नव्हते, कारण हे आता जरी सत्य असलं तरी ते अंतिम सत्य नव्हतं.**

सध्या काम मुंबईतच होतं, मात्र नंतर ते एखाद्या गरजेच्या ठिकाणी असणार होतं. महिना लोटला होता. काम सुरळीत चाललं होतं. काम करायचं कसं हेच शिकणं सुरु होतं. मी काम शिकत होतो आणि त्याला अजून छान कसं करता येईल ते मी शिकत होतो.

आज रविवार होता सुट्टीचा दिवस, मी ऑफिसला आलो होतो. सुट्टी होती मात्र काम अपूर्ण असल्यामुळे मी आलो होतो. मी माझ्या कॅबिन ला शांत काम करत बसलो होतो. मन थकल्या सारखं वाटत होतं. तिची आठवण होतीच. मी खूप प्रयत्न केला होता तिचा नंबर शोधण्याचा पण तो मिळाला नव्हता. मात्र आठवण येत होती. असं नव्हतं कि या आधी तिची आठवण येत नव्हती, आणि तसं आठवण न येऊ देण्याचा प्रयत्नसुद्धा मी करत नव्हतो. कारण ती आठवण दुख:द नसून आनंदायीच होती, पण आज जरा जास्तच येत होती. अस्वस्थता वाटत होती.

मी असाच काम करत बसलेलो असताना, अचानक वातावरणात बदल जाणवू लागला. पहिल्या दिवशी येणारा सुगंध पुन्हा सर्वत्र दरवळू लागला. माझ्या मनाला आनंदाचा स्पर्श, प्रसन्नतेची जाणीव होऊ लागली, मला हे समजण्यासाठी एक क्षणसुद्धा लागला नाही, कि हे सर्व तिच्या येण्यामुळे होतं. माझे डोळे न कळताच तिचा शोध घेऊ लागले, त्यांना इतक्या दिवसापासून तिला बघण्याची इच्छा होती. आज जर ती भेटली तर मी तिला एक क्षण वाया न घालवता सर्व सांगून टाकेन. असच मी मनाशी ठरवलं होतं. ती खूप special होती माझ्या साठी, अगदी सर्वार्थाने. पण काहीही ठरवणं आणि ते पूर्ण होणं यात फरक असतो . तो फरक म्हणेज दुसरा काही नसून .. फक्त आत्मविश्वास आणि धाडस दुसरं काही नाही..... **ऐरवी मी कुणाला घाबरणं हे शक्य नव्हतं , पण मात्र ती समोर आली कि तसं होत होतं.**

इतक्यात माझ्या कॅबीन च्या काचमधून ती येताना दिसली, सुंदर ... पूर्वीपेक्षा.. मात्र आता न घाबरलेली, आत्मविश्वासाने भरलेली.

कदाचित तिचीसुद्धा निवड झाली होती, मी बाहेर निघून तिला भेटावं म्हणून बाहेर गेलो, ती समोर उभी होती, मी तिच्याकडे बघत पुढे जाऊ लागलो .. मनात आनंद तर होताच, तिला आज वेळ वाया न घालवता सर्व सांगावं असच मनाला वाटत होतं पण ...

मी जवळ जात होतो, तेवढ्यात तिची नजर माझ्याकडे वळली, मी अगदी नैसर्गिक हास्यात होतो मात्र, तिच्या चेहऱ्यावरचे भाव जरा ... जरा नाही, तर

अगदी भिन्न होते, ती माझ्याकडे न बघता तशीच पुढे निघून गेली. अगदी कधी पाहिलं नाही असं, अनोळखी सारखं... काही दिवसांपूर्वी आम्ही दोघांनी सोबत चहा घेतला होता. किती तरी वेळ बोलत बसलो होतो. मात्र आता, साधं हास्य हि नाही ....

मनात न राहून विचार येत होता ..

**“लोकं दिसतात खरंच तशी असतात का...? ??**

**कि त्यांनी दाखवलेलं त्यांचं तसं रूप. ”**

“या जगात कोणीच इतक व्यस्त नसतं जितकं ते सांगतात आणि कुणीच इतकं रिकामं पण नसतं जितकं ते दाखवतात, इथे प्रश्न येतो तो फक्त प्राधान्या चा बस्स”

**(No one is as busy as he says and No one is as free as he shows, it just a matter of priority nothing else)**

इतरांच्या बाबतीत ते असेलहि खरं, मात्र आयुष्यात पहिल्यांदा एखादी व्यक्ती, मनाला इतका गर्द स्पर्श करणारी आणि तिच्या बद्दल मनाचं भाकीत खोट ठरावं का?

**मन म्हणजे देवाने निर्माण केलेल्या जीवाचा एक पवित्र कोपरा ज्यात सर्व पवित्र गोष्टींचा समावेश होतो, त्या साठतात, फुलतात आणि त्यांचा एक नवीन पावित्र्याने भरलेलं रूप तयार होऊन, पुन्हा त्या निर्मात्याच्या प्रवाहात प्रवाहित होतात.**

त्या भागाने जर एखाद्याबद्दल असं वर्तवावं आणि तेही पहिल्यांदाच, तर त्याला काही तरी अर्थ असलाच पाहिजे, पण मात्र तसं नव्हतं, असो मात्र तरी ती तितकीच पवित्र्याने भरलेली देवाची सुंदर वस्तू होती.

ती गेली, मात्र माझं मन अजूनसुद्धा ते स्वीकारण्यासाठी तयार नव्हतं, जे मी माझ्या डोळ्यांनी बघितलं होतं नुसतं बघितलंच नाही तर, अनुभवलं होतं.. मात्र, या जगात प्रत्येक गोष्टीला कारण असतं, कारण विरहित या जगात कोणतीच गोष्ट होत नाही. आणि बऱ्याचदा सत्य काही वेगळं असतं मात्र आपण काही वेगळच पाहतो, आणि त्याचा अर्थ काही वेगळाच लावतो.

**या दिसण्या - दाखवण्याच्या खेळाने सर्व गोंधळ करून ठेवला आहे, आणि गंमत अशी आहे या खेळात प्रेत्येकाला वाटतं, “ मी खेळलेला खेळ बरोबर आणि मी जिंकतही आहे पण.. इथे जिंकत कुणीच नाही, जिंकतो तो फक्त एकच ते म्हणजे ‘ खोटं ’ कारण प्रत्येक जन त्याचाच सहारा घेतं. “ नाही का? ??**

असाच मी विचार करत होतो, दिवस संपला मात्र विचार ... विचार तर कधीच संपत नाहीत.

आजचा दिवस असाच पूर्ण झाला अगदी छान .. हो छानच कारण खूप गोष्टी चांगल्या झाल्या होत्या.

उद्या पुन्हा चांगल्या गोष्टी घडणार होत्या, कारण प्रत्येक नवा दिवस खूप काही नविन करण्यासाठी असतो. हे मी ऐकून होतो.

असं माझं काम सुरु होतं काम अगदी चांगल्या पद्धतीने चाललं होतं. तीसुद्धा तिथेच होती. या नंतर दोन तीनदा मी तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, मात्र ती बोलण्याला प्रतिसाद देत नव्हती, तिच्याशी बोलावं अस जरी मला मनापासून वाटत असलं तरी, **ते बोलणं जबरदस्तीचं, बोलण्याची इच्छा नसलेलं असावं ते मला नको होतं. ते आतून असावं, अगदी मनाच्या तळापासून, अगदी पाक, ज्यात भेसळ नसावीच, उद्देश नसावा ...**

त्या बोलण्याला पण काही अर्थ असेल का? ज्यात जबरदस्तीचं बोलणं असेल.

त्या वागण्याला पण काही अर्थ असेल का?? ज्यात सर्व वागणं देखावा असेल. त्या काळजीला पण काही महत्व असेल का?? जी बनावट असेल.

या पैकी एकही गोष्ट मनापसून नसेल तर, त्यातल्या एकाही गोष्टीला तिळमात्र महत्व नसणार.

**“जर उद्देश असला कि, ते वागणं, बोलणं बनावट बनतं. त्यात साध्य येतं आणि एकदा साध्य आलं कि, ते साध्य करण्यासाठी.. मग राजकारण सुरु होतं, खोटं सुरु होतं आणि मग पुढे सर्व नातं खोट्याच्या आधारावर बनतं आणि त्याचं पुढे काय होणार हे काही वेगळं सांगायची गरज नाही. ”**

**म्हणून मी तिच्याशी  नंतर बोलण्याचा प्रयत्न केला नाही,  कारण मला ते बनावट वागणं,  देखावा आणि ते उपकार केल्यासारखं वागणं,  जबरदस्ती चं बोलणं  जमलंही नसतं आणि ते मला नको होतं,  तसं करण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती.**

**“एखाद्याच्या मनात जागा मिळवायला मला आवडेल पण चेहऱ्यावर नको,**

**“चेहरा लोकं बघून खोटं बोलतो,  बदलतो .. मन नाही. ”**

**“i would like to become a choice not an option”**

असेच दिवस जात होते,   वेळ जात होती,  तसं आम्ही जवळ येत होतो,  आम्ही बोलत होतो थोडं कामानिमित्त का असेना पण बोलत होतो आणि थोडं एकमेकांबद्दलही. सर्व  अडचणी वर उपाय असतो. काही वेळेस तो  “वेळे” च्या किंमतीत राहू शकतो किंवा दुसरा कोणता उपाय राहू शकतो,  मात्र “वेळ” हा उपाय असतोच.

आम्ही बोलत होतो मात्र मी अजूनपर्यंत तिला सांगितलं नव्हतं

How much she is special for me???

कदाचित तिला ते सांगितलं तर,  **“एखाद्याला आपण खूप जास्त महत्व दिलं तर त्याच्या पुढे आपलं महत्व कमी होतं. असं ऐकलं होतं. ते माझ्या बाबतीत घडावं अशी माझी मुळीच इच्छा नव्हती. ” मात्र ते काहीही असो हा प्रश्न तिचा असणार होता. तिने काय करावं हे सर्वस्वी तिच्यावर अवलंबून असणार होतं.**

तिने माझ्या सोबत असावं, माझी काळजी घ्यावी, असं मला मुळीच वाटत नव्हतं. पण द्वेष पण नको होता, तिरस्कार पण नको होता.

मात्र ती विशेष होतीच आणि आज अजून जास्त विशेष ती झाली होती.

एक घटना ज्यामुळे तिच्याबद्दल मनात अजून आदर वाढला होता. आणि ती घटना बरोबर याची खात्री देत होती. आम्ही आज कामा निमित्त दुसऱ्या गावाला गेलो होतो. यायला उशीर होत होता. रात्र झाली होती. रात्रीचे १२ वाजले होते. प्रवास लांबचा असल्याने गाडी चालकाला झोपेचा त्रास नको म्हणून आम्ही गाडी थांबवली. जवळच एक प्रसिद्ध गणपतीचं मंदिर होतं. रात्र झाली होती, मंदिर बंद असेल मात्र तरी driver ला थोडा आराम म्हणून आम्ही मंदिरात जाऊन येण्याचं ठरवलं. आम्ही सोबत जास्तच लोकं होतो पण तरी माझी नजर तिच्याचकडे होती. गाडी पार्क करून सर्व मंदिराकडे जाऊ लागली. ती हि जात होती मात्र, **निराळ्या माणसाला त्याचं निराळंपण लपवता येत नाही, ते आपोआप बाहेर येतं.** ती जात असतांना एक लहान मुलगा वय जवळ पास १५ वर्ष असेल, तो तिथे पार्किंगच्या ठिकाणी काम करत होता. आधी गेलेल्या सर्वांनी त्याला पाहिलं होतं, मात्र तो इथे का? इतक्या रात्री.. कुणाला ते विचारावंसं वाटलं नाही परंतु ती त्या मंदिरात देवाला भेटण्या आधी या देवाच्या बनवलेल्या जिवंत देवाच्या प्रतिकृती ला भेटत होती. मी तिच्या मागेच होतो.

“ऐ इकडे ये”, ती बोलली.

“काय.... बोला”, तो मुलगा म्हणाला.

“तुझं नाव काय आहे”, तिच्या त्या प्रेमळ आवाजात ती त्याला विचारत होती.

पिंटू ... तो मुलगा म्हणाला.

“पिंटू छान नाव आहे, शाळेत जातो, कितवीत आहेस”.

मग पिंटू अगदी आनंदात उत्तरला १०वी ला, कारण आजपर्यंत इथे येणाऱ्या कुणीच त्या मुलाला साधं नाव देखील विचारलं नव्हतं.

इथे काय करतोस?

तो हसत म्हणाला, “मी इथे काम करतो रात्रीला”.

“मग शाळा कधी करतो रे”? पुढे विचारत ती म्हणाली

तो म्हणाला, “करतो कि सकाळी”

तिकडून निशा तिला आवाज देऊ लागली,

आराध्या , कुठेय, चल लवकर?

मग ती होकार देत म्हणाली , येते

मग परत पिंटू ला ती बोलू लागली,

अभ्यास करतो कि नाही आणि झोपतो कधी रे? असं हक्काने त्याला ती विचारात होती.

यावर पिंटू छान उत्तर देत म्हणाला,

करतो कि आणि झोप पण होते.

**“अभ्यासाला आणि झोपेला जागा लागत नाही ताई”. ते कुठेही करता येतच.**

येतो मी .. इतकं बोलत तो दुसरीकडे गेला आणि आम्ही मंदिराकडे.

त्यावर ती हातातले बोटं एकमेकांवर ठेवत मनात काही तरी पुटपुटत होती.

आम्ही मंदिरा जवळ पोहचलो मात्र रात्र असल्यामुळे मंदिर बंद होतं.

देवाला का रात्री बंद करता कुणास ठाऊक.

सर्व थोडे नाराज झाले होते कारण देवाचं दर्शन झालं नव्हतं.

मात्र ती आनंदात होती. त्याचं कारण मला नाही समजलं तर ते आश्चर्यच राहिलं असतं. ती आनंदी होती कारण, ती बाहेर एका जिवंत देवाच्या प्रतिकृती ला भेटली होती. त्याच्या मनापर्यंत पोहोचली होती. ते सर्व त्या निर्जीव देवाकडे धावत होते मात्र, ती त्या वेळेस त्या मुलाशी हितगुज करत होती. यापेक्षा आनंद देणारं दुसरं काय असणार होतं.

या प्रसंगामुळे ती अजून माझ्यात खोलवर शिरली होती. हीच माझ्या कल्पनेतली ती होती जी **“आराध्या”** बनून समोर उभी होती. **“एखाद्याला प्रेमाचे दोन शब्द, त्याच्या त्रासावर, दुखावर मात करण्याची ताकत त्याला देत असतात. लोकांच्या दुखाची, त्रासाची जाणीव करणं प्रत्येकालाच जमत नसतं. ”** पण हे सर्व ती अगदी छान करू शकत होती. अगदी नैसर्गिक रित्या.

पण हे सर्व मी तिला सांगायला घाबरत होतो.

“बरयाचदा लोकांना खरं हे अतिशयोक्ती सारखं वाटतं. कुणास ठाऊक अशा वेळेस विश्वास कुठे जातो. ”

मी घाबरत होतो, कारण तिला सांगितल्या नंतर जर ती दुखी झाली तर. यामुळेच मी तिला सांगितलं नव्हतं. आणि हे अगदी खरं होतं, **“आपण घाबरतो**

**तेव्हाच जेव्हा काही तरी गमावण्याची शक्यता असते ”**. आणि त्याच शक्यतेमुळे मी तिला काहीच सांगू शकलो नव्हतो, अर्थात तिला दुखावणे हे मला आवडणारं नव्हतंच.

मात्र मी तिला सांगयला पाहिजे, असं मला तर वाटतच होतं मात्र माझ्या जवळ ची असणारी माझी एक मैत्रीण निशा तिला देखील तसंच वाटत होतं. अर्थात ती मला रोज सांगायची.

“श्याम तू नसेल सांगत तर मी सांगते !!

काय होणार आहे?? हो म्हणेल नाही तर नाही. ! !

या व्यतिरिक्त दुसरं काही असतं का रे. ”

मी फक्त नको, नको म्हणत वेळ पुढे नेत होतो.

पण ती रोज मला आठवण करून देत होतीच.

आणि हो मला तिच्या ‘हो किंवा नाही’ याची भीती नव्हतीच.

कारण ती ‘हो किंवा नाही’ या चौकटीत बसणारी नव्हतीच, ती माझ्यासाठी त्या पलीकडे होती, अगदी सीमा नसलेली, म्हणून तिच्या ‘हो किंवा नाही’ चा विचार मनात नव्हताच.

पण निशा वारंवार तेच सांगत होती,

“मग सांग तिला उशीर नको व्हायला. ”

हो. बरोबर.. असं म्हणत मी तिला सांगायचं ठरवलं.

पण तरीसुद्धा माझं मन अजून मला अनुमती देत नव्हतं. पण मी सांगायला पाहिजे हे नक्की होतं, म्हणून मी आधी तिला याबद्दल काय वाटतं हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

एके दिवशी आम्ही सहज असेच काही तरी कामाचं बोलत असताना मी तिला सहजच विचारलं,

hey आराध्या, एक विचाराचंय तुला, विचारू का??

तिचं नाव 'आराध्या' होतं.

आराध्या ... नेतृत्व करणारी , सुरुवात आणि मुक्कामापर्यंत पोहोचवणारी.

कुठल्याहि गोष्टीची सुरुवात जिथून होते, ती सुरुवात म्हणजे 'ती'.

माझ्यासाठीची सुरुवातहि ती होती आणि मुक्कामसुद्धा.

आराध्या .....

"अरे विचार त्यात काय !!", ती मला विचारातून बाहेर काढत म्हणाली.

माझा एक मित्र आहे. त्याला माझी मदत हवी होती,

आणि म्हणून मला तुझी मदत हवी आहे, त्याची मदत करण्यासाठी. , , , ,

माझी सर्व भाषा गडबडत होती, आणि बोलण्यात भीती अगदी स्पष्ट जाणवत होती.

पण तरी ती भीती सावरत मी विषय पुढे करत बोलू लागलो. मला तुझं suggetion हवंय.

अरे माझा मित्र आहे, २ महिन्या पूर्वी तो एक मुलीला भेटला, ती सुंदर आहे यात शंका नाहीच, पण त्यात विशेष आहे. ती तरुणी दुसरं कुणी नाहीच तर त्याच्या स्वप्नातल्या तरुणी सारखीच होती. म्हणजे ....

“ तिला भेटण्या आधी त्याच्या मनात जी कल्पना होती, जी प्रतिमा त्याच्या मनात होती अगदी तशीच्या तशी किंबहुना त्यापेक्षा हि जास्त ती मुलगी तशीच होती ”. अगदी तिला पहिल्या नंतर तो प्रसन्न, आनंदी अनुभव करतो जरी तो कितीही निराश, हताश, नाराज असला तरी.

‘माझ्यातल्या” अपूर्णत्व ला पूर्णत्वाचं रूप देणारी.

काय... काय म्हणाला ..? ?? माझ्या तोंडून चुकून ‘त्याच्या’ जागेवर ‘माझ्या’ शब्द निघाला.

अरे, “त्याच्यातलं अपूर्णत्व ला पूर्णत्वाचं रूप देणारी” शब्द सावरत मी बोलू लागलो.

जसं स्वप्नांनी सत्याचं रूप घ्यावं आणि समोर येऊन उभं राहावं...

असं त्याला वाटतं

हे सर्व मी तिला सांगत होतो, “हे सर्व तिच्याबद्दल होतं, आणि माझ्या मनातलं होतं पण मी ते एका मित्राच्या नावाने सांगत होतो. ”

विषय पुढे नेत मी बोलू लागलो,

पण तो हे सर्व तिला सांगायला घाबरत आहे, तिला राग येईल किंवा तिला काय वाटेल.

so what you think? तुला काय वाटतं त्याने काय केलं पाहिजे,  जे योग्य राहील??

यावर तिचं उत्तर खूप महत्वाचं होतं माझ्यासाठी,  कारण मी तिला सांगावं किंवा नाही हे तिच्या उत्तरावर अवलंबून होतं,

मी अगदी स्तब्ध होऊन ऐकत होतो. ती काय सांगेल ते ऐकण्यासाठी आतुर होतो.

मी श्वास रोखून ते ऐकत होतो.

ती बोलू लागली ..

“जर हे खरं असेल तर त्याने तिला सांगितलं पाहिजे,  आणि त्या मुलीला राग येणार नाही,  ती तेवढं समजून घेईल,  आणि हो ते तिला ऐकायला आवडेल कि ती कशी आहे,  एखाद्या मुलीला हे नक्कीच आवडेल कि एखाद्याच्या स्वप्नातल्या काल्पनेशी  ती एकरूप आहे. कदाचित असं नशिबानेच होत असेल म्हणून तिला हे सांगण्यात काहीच चुकीच नसणार आहे. ”

ती बोलत होती,  मला समजावून सांगत होती ..

मला  अस वाटत होतं तिला आत्ताच सांगून टाकावं. काय खरं आहे ते. पण नको नंतर कधीतरी .

पण एक गोष्ट नक्की आहे ..

**“जेव्हा स्वप्न सत्याचा रूप घेतं तेव्हा,  तोच जगातला सर्वात  मोठा आणि खरा  संकेत असतो”,** असं मला वाटतं.

तिच्या त्या उत्तराने मला थोडं धाडस मिळालं होतं. पण तरी मी घाबरत होतोच.

पण  आता सत्य तिला सांगणं हे नक्की झालं होतं. फक्त कधी तेच बाकी होतं.

निशा हि तेच सांगत होती मात्र मी ते ऐकत नव्हतो. पण आता मी तिला सांगणार होतो,  फक्त कधी ते पहायचं होतं.

कुठे ते तर पक्क होतंच. तीच जागा जिथे आम्ही आधी भेटलो होतो. **दोन चहा.. एक चहा पकडलेला हात  दुसऱ्या हाताची वाट पहात**. त्या जागी मी तिला सांगणार होतो.

असेच दिवस जात होते,  मी तिला रोज नवीन पहात होतो,  ओळखत होतो. तिच्या वागण्याचे  वेगवेगळे पैलु समोर येत होते जे या आधी माझ्या परिचयाचे होतेच. मी कामा निमित्त काही दिवस बाहेर जाणार होतो आणि आता तिकडून परत यायला किती वेळ होईल माहित नव्हतं,  म्हणून तिला सांगण्याचं ठरवलं होतं.

आता मनाशी पूर्ण निश्चय केला होता,   हे ठरवलंच कि तिला काय ते सांगायचं. आणि बस्स..

आणि मी तिला फोन केला,

hey  आराध्या ,  श्याम बोलतोय

I want to meet you,

and as well speak something ..

Can you meet me?

She said,  yes ..  but when? ??

At 7 PM. is it fine for you??

(dont worry its after our office time)

If you will have possible to come.

we will go for dinner,

Can you come??

Yes,  i will,  but where to go? she asked.

Come first then i will tell you... ok

ok. bye.

मी तिला भेटायला बोलावलं होतं,  आज सर्व सांगून टाकायचं होतं.

मी तिच्या समोर गेल्यावर हे सर्व इतक्या सहज बोलू शकणार नाहीच हे मला माहित होतंच,  म्हणून जर मी तिला सांगू नाही शकलो,  तर मी दुसरा पर्याय म्हणून तिला ते लिहून देण्याचं ठरवलं होतं. मात्र ते परिस्थितीवर अवलंबून होतं, पण मी दोन्ही पर्याय सोबत ठेवणार होतो.

आयुष्यात नाही तेवढा मी आज  उत्साहित ....,  आतुर... ,  अधीर... मानवाच्या स्वभावातले जेवढे भाव होते ते सर्व भाव आज माझ्या चेहऱ्या समवेत हृदयात आणि पर्यायाने वागण्यात दिसत होते.

मी वाट पहात होतो संध्याकाळ ची, हे सर्व पहिल्यांदा घडणार होतं म्हणून उत्सुकता असणं स्वाभाविकच होतं.

मी तिला सांगितलेल्या ठिकाणी bike घेऊन उभा होतो. तिची वाट पहात, घड्याळाचे काटे आज खूपच हळू फिरत होते. 'वेळ' तो जात नव्हता. आणि माझी नजर पुन्हा पुन्हा त्या घड्याळाच्या काट्यांकडे जात होती. हे मला अगदी चांगल्या पद्धतीने कळत होतं. ना वेळ हळू जात होता ना अजून काही. फक्त एक गोष्ट होती ती म्हणजे मी खूप जास्त वाट पहात होतो आणि मी अधिक जास्त उत्साहित होतो.

आणि ते असणारच होतं, कारण आज मी त्या स्वप्नातल्या मुलीला भेटणार होतो. तिला सर्व काही सांगणार होतो आणि म्हणून हे असं होणारच होतं.

माझी नजर ती येणार असणाऱ्या रस्त्याकडे एक सारखं मी रोखून धरली होती. त्यांना तिचीच ओढ लागली होती, ती समोरून येताना दिसली, ती येत होती मी थोडा शहारलो, थोड्याच वेळात ती अगदी समोर येऊन थांबली, आता मी काही विचार करण्याच्या आधीच ती समोर आली होती, आता हेच घड्याळाचे काटे अगदी वेगात धावू लागले होते. जे या पूर्वी अगदी शांत आणि हळू फिरत होते.

**वेळ ... कसा असतो कधी कसा फिरेल हे कुणालाच कळत नाही.**

ती आली! समोर आली, ती सुंदर होती हे मी पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज नाही. पण ती आज अजून जास्त सुंदर दिसत होती, त्या मागचं कारण होतं, ती अधिक साधी, साधारण वेशात होती. "साध्या वेशात व्यक्ती अधिक सुंदर दिसतो", **कारण त्या वेशात तुमच्या कपड्यांपेक्षा .. तुमच्या देखाव्यापेक्षा... तुम्हीच जास्त बोलत असता, तुमच्या नैसर्गिक असण्याने. आणि शेवटी व्यक्ती हा कृत्रिम देखावा किती वेळ ठेवू शकतो, फार तर फार तास दोन तास आणि झालंच तर दिवस.**

पण नंतर काय? ?? . ?  .? .?

तिच्या  ओठांना लाली नव्हती,  झग मग मला बघा सांगणारं तीच व्यक्तिमत्व दिसत नव्हतं. ती सुंदर आणि सोज्वळ दिसत होती,  अगदी छान.

hey hello,

कुठे हरवला??

तुला काय असं हरवायची सवय आहे का रे?

त्या दिवशी पण त्या समुद्र किनारी असाच बघत होता,  काय पाहतोस कुणास ठाऊक. ती बोलली.

hmm hmm. english च्या या अर्थ नसलेल्या शब्दाने आज माझी मदत केली या प्रश्नाला टाळण्यासाठी. तिला आता कसं सांगू कि तेव्हा हि तीच समोर होती आणि आताही.

असो  काही गोष्टी न सांगणंच उत्तम.

चल,  खूप झालं joke.. बसा आता गाडी वर

अरे हो पण जायचं कुठे?

अरे चल कि सांगतो रस्त्यात.

बस आधी तुला कुठे अमेरिकेत नाही नेत. बस  गपचूप.

मस्करी करत मी म्हणालो

बरं बरं..

ती गाडीवर बसली, आणि गाडी सुरु करत मी निघालो, अर्थात जायचं कुठे मला देखील माहित नव्हतंच.

मी एका हॉटेलचं नाव मित्रांकडून माहित केलं होतं. त्या ठिकाणी जायचं ठरवलं, आणि त्या हॉटेलला जायला निघालो. ती माझ्या मागे बसली होती, आणि बोलत होती. मीही मध्ये मध्ये ऐकत आणि बोलत होतो.

आमच्या गप्पा सुरु होत्या. हॉटेल तसं जवळच होतं. मात्र रस्ता भरकटल्यामुळे थोडा उशीर होत होता. पण तो उशीर मला उशीर वाटत नव्हताच. कारण ती माझ्या मागे बसली होती म्हणून कसला उशीर आणि कसली घाई.

थोड्या वेळाने आम्ही पोहचलो.

हॉटेल बाहेरून खूप छान दिसत होती, अगदी नावाला शोभेल अशीच, मी गाडी पार्क करून आम्ही आत गेलो.

हॉटेल च्या बाहेर असणाऱ्या एक माणसाने

welcome to GREEN FIELD .. sir and madam...

असं म्हणत आमचं स्वागत केलं.

आत शिरलो, तिथून आत जाण्यासाठी एक गुफे सारखं entrance होती, ते अगदी हिरविगार दिसत होती.

सुंदर डोळयांना हवं-हवंसं वाटणारं ते दृश्य होतं. आम्ही आत गेलो, तिच्या चेहऱ्यावरचा आनंद मी पाहू शकत होतो. आत गेल्यावर पुन्हा एक हॉटेल चा कर्मचारी येऊन म्हणाला,

“welcome sir, कुठे बसणार? ”

मी तिच्याकडे बघत म्हणालो,  कुठे?

आजूबाजूला दोन जागा होत्या,  त्यापैकी एक  मेनबत्तीने सौम्य प्रकशित होती (candle light )  आणि एके ठिकाणी light परंतु ते हि सुंदर अश्या दोन जागा होत्या. मला मनापासून वाटत होतं कि तिने मेनबत्तीने सौम्य प्रकाशा (candle light)कडेच सांगावं. आणि तिने ते सांगितलंही. आम्ही त्या सुंदर संध्याकाळी आणि रात्री,  वरती छत नसलेल्या मेणबत्ती च्या सौम्य पण डोळयांना आणि मनाला हव्या असणाऱ्या प्रकाशात एका टेबला वर बसलो.

तिथेच जवळ एक सुगंधित सुगंध देणारी धूप लावलेली होती,  आणि आश्चर्याची  बाब म्हणजे त्या धूप चा सुगंध हा तोच होता जो,  'ती समोर आल्यावर मला जाणवायचा'. आता यात अतिशयोक्ती नव्हती,  आणि याचं कारण,  उत्तर जर हवं असेल तर ते मानसशास्त्र अगदी योग्य पद्धतीने देऊ शकतं

मात्र तो सुगंध येत होता हे खरं.

तिच्या हातात menu card देत मी तिला order द्यायला सांगितला कारण शेवटी हे सर्व तिच्या साठीच होतं.  जेवण यायला थोडा उशीर होता. आता सर्वत्र शांतता होती. आवाज तो कशाचाच येत नव्हता. शांत अगदी  शांत ...  मी अगदी uncomfortable होतो आणि ती हि,  कारण मी असं काही पहिल्यांदाच करत होतो. आणि येताना तीनेसुद्धा सांगितलं होतं कि,

" तीसुद्धा पहिल्यांदा बाहेर कुणासोबत dinner ला जात होती.

म्हणून स्वाभाविकच  दोघं हि uncomfortable होतो. पण अस्वस्थेच्या परिस्थितिला बदलंवत,  त्या  शांततेला बाजूला करत आम्ही बोलू लागलो,

विषय काय? ? ,

कसा? ?

का??

या बांधून ठेवणाऱ्या गोष्टींचा विचार न करताच, बोलत आम्ही जेवण पूर्ण केलं.

आणि नंतर त्या थंडीत, थंडीचा आणखी मजा यावा यासाठी icecream मागवली. किती उलट नाही का?? पण उलट गोष्टी परिस्थिती निट आणि सुरळीत करण्यात मदतगार असतात. कारण सोपं आहे ....

**सरळ परिस्थितीत आपण सरळच वागण्याचा, बोलण्याचा प्रयत्न करतो.**

मात्र उलट परिस्थितीत थोडा गोंधळ होतो आणि काहीतरी नवीन वेगळं बाहेर येतं. म्हणून तो वेगळेपणा प्रत्येकाचा बाहेर येणं आवश्यक.

आता आम्ही निघालो.

ती बोलत होती,

"खूप छान वाटलं, मी पहिल्यांदा, असं रात्री आणि एका मुला सोबत बाहेर फिरत आहे. हे माझ्यासाठी खूप अवघड आणि भीतीदायक आहे. परंतु तरी मी आले. भीती म्हणजे असं मी कधी नाही केलं म्हणून थोडं ..... "

आणि आज आपण सोबत आहोत. आधी मी तुझ्याशी बोलत नव्हती मात्र नंतर अचानक बोलायला लागले हे सर्व कसं? घडलं आणि का? मला नाही सांगता येणार, पण झालं ते..., "ती बोलत होती. "

तिला काय बोलायचं आहे मला समजण्यासाठी थोडाही उशीर लागला नाही. अर्थात हेच नव्हे...

**बऱ्याचदा समोरचा काय बोलणार !!, काय करणार!!, का करणार !!! आणि कसं !!!**

हे मी अगदी योग्य आणि मुद्देसूद पद्धतीने सांगू, समजू शकतो. म्हणून मला संपूर्ण गोष्टी समजण्यासाठी वेळ लागला नाही. आणि ती तर माझ्या सर्वात जवळची होती म्हणून तीचं बोलणं तर वेळ न घालवता मी समजू शकत होतो.

आता आम्ही निघालो, बाहेर हवेत चांगलीच थंडी होती, पण तिने खांद्यावर ठेवलेल्या हातामुळे ती थंडी गुदगुल्या करत आहे असच वाटत होतं. आणि त्या खांद्यावर ठेवलेल्या हातामुळे थंडीची जाणीवच होत नव्हती. bike सुरु करून निघालो, आता मी तिला सांगण्याची वेळ जवळ येत होती, उद्या मी जाणार होतो. तिला कदाचित ते माहित नसणार, आणि आज तिला सर्व सांगून मी जाणार होतो. तिला हे सर्व सांगण्याचा काही एक उद्देश नव्हताच, हे आधीही सांगितलं होतंच, **"उद्देश काही तरी साध्य करण्यासाठी असतो मात्र इथे साध्य ते काही करायचंच नव्हतं. "** म्हणून हे सर्व उद्देश रहित सुरु होतं.

आणि न मी कोणत्या परिणामाची वाट पाहणार होतो. हा फक्त आता याचा परिणाम काय हेच महत्वाचं होतं, घेतलेला निर्णय योग्य कि अयोग्य हे या परिणामा वरून कळणार होतं. कारण निर्णय योग्य कि अयोग्य हे अवलंबून असतं त्याच्या परिणामा वरून.

मात्र परिणाम काहीही असो, एक गोष्ट होती ती म्हणजे ... **ती...** तिचा आनंद, तिच्या चेहऱ्यावरच ते हास्य, **जे एखाद्या दुखी माणसाला दाखवलं तर,**

**क्षणात त्याचं दुख दूर व्हावं. इतकं परिणाम कारक तिचं ते हास्य.** तिचं सौंदर्य, ज्याची तिला जाणीवच नव्हती, पण तरी ते तिने अगदी पवित्र पणे सांभाळून ठेवलं होतं, टिकवून ठेवलं होतं.

हे सर्व तिचं असच आणि त्यात कणाचा हि क्षय, लय न होता ते असच वाढत जावं. अशीच प्रार्थना तिच्यासाठी मनाच्या गाभारयामधून निघत होती.

ती एकदा बोलली होती, **"देवा कळून काही हि न मागणेच योग्य, सर्व असताना का मागावं, आणि जरी नसलं तरी मागावं तरी का"??**

असं ती मला बोलली होती, जे मला हि योग्य आणि मी हि तोच विचार करायचो मात्र,

पण यापुढे जाऊन बोलायचं तर, हे मागणं स्वतःबद्दल नसावं. आणि मी हे सर्व माझ्यासाठी नाही तर तिच्या साठी मागत होतो.

आणि माझी श्रद्धा आहे, **"जर मनाच्या अंतकरणातून जर एखादी गोष्ट मागितली तर ती पूर्ण होते मात्र ते मागणं हे दुसऱ्यासाठी असावं लागतं"**

स्वत:साठी मागितलेलं मिळण्यावर माझी श्रद्धा नाहीच. आधीही नव्हती आणि आताही नाहीच.

पण जेव्हा स्वप्न सत्य बनून समोर येतं तेव्हा त्या स्वप्न रुपी सत्यासाठी मागणं काही गैर नव्हतंच आणि ते मी माझ्यासाठी मागत नव्हतोच. ते सर्व तिच्यासाठी मागत होतो.

असा किती तरी विचारांचं काहूर माझ्या मनात, डोक्यात मेंदूत आणि हृदयात एकाच वेळेस खेळ मांडत होते.

आम्ही आता गेट वे ऑफ इंडिया ला येऊन पोहोचलो होतो. मी इथेपर्यंत कसा आलो, काय बोलत आलो. हे माझं मलाच कळत नव्हतं.

“रात्र झाली होती, उशीर झाला होता. सर्वत्र अंधार होता, अफाट अंधार, मात्र त्या अधांरला गरजेचा उजेड चंद्राचा प्रकाशामुळे मिळत होता. चंद्राचा प्रकाश अधून-मधून ढगांच्या मधून त्या काळोखाला प्रकाश पुरवत होता. त्यात मागून समुद्राच्या लाटा संत आवाज करत मात्र, त्या अंधार, प्रकाश यांना जुळवून घेत वातावरणात नैसर्गिक संगीत तयार करत होत्या. ”

अशा त्या वातावरणात मी आणि ती त्या समुद्राच्याकडेला उभे होतो, ती गाडीला टेकून उभी होतो, मी तिला काही तरी सांगणार होतो. किती तरी वेळ जात होता मी काय बोलावं, कसं बोलावं याच गोंधळात होतो. अर्थात गोंधळ नव्हता तर फक्त भीती होती, कारण हा निर्णय होता जो अजून योग्य किंवा अयोग्य हे ठरण्याचा बाकी होतं आणि त्यामुळेच ती भीती होती. आणि भीती असते केव्हा जेव्हा आपण काही तरी गमावण्याची शक्यता असते. अशी सर्व परिस्थिती होती म्हणून मी विचारात होतो.

तेवढ्यात माझ्या लक्षात येत होतं .. इथे आजू बाजूला असलेलं वातावरण हे अगदी मला आलेल्या तीन स्वप्नात असणाऱ्या वातावरणा सारखंच होतं. त्या पुढे जाऊन हे समजण्यासाठी मला उशीर लागला नाही, कि स्वप्नात मी एका मुली सोबत रात्री एका समुद्राकिनारी होतो हे सर्व स्वप्न होतं कि खरं हे ठरवणंच अवघड होऊन बसलं होतं.

ते स्वप्न इतकं खरं वाटत होतं अगदी सत्या सारखं आणि हे सत्य स्वप्नासारखा वाटत होतं.

स्वप्न म्हणजे मनातल्या भावनांचं प्रतिबिंब,

आणि स्वप्न म्हणजे सत्य होणाऱ्या गोष्टींचा संकेतसुद्धा.

या सर्व गोष्टींना बाजूला करत मी सांगू  लागलो.

hey i dont know how to speak.   .. but.. but

बोल काय  ...??  ती प्रतीसात देत विचारत बोलली

“अरे मला तुला एक सांगायचं आहे”,  मी पुन्हा घाबरत बोलू लागलो.

“आता बोलशील का”? तिने पुन्हा विचारलं.

मी इतका घाबरलो होतो की माझ्या तोंडून शब्द निघत नव्हते.

काही तरी बोलायला हि भीती वाटते हे मी आज पहिल्यांदा अनुभवत होतो.

माझ्या हृदयाचे  धडकण्याचा वेग वाढलेला होता,  आणि अंगात थोडा थरकाप होताच,  थोडक्यात मी घाबरलो होतो.

“हा बोल” ,   मला विचारातून बाहेर  काढत  ती बोलली.

ती मला बोलण्यासाठी सांगत होती.

मी मोठ्याने श्वास घेतला आणि बोलू लागलो,

तुला मी दोन गोष्टी खोट्या सांगितल्या आहेत,

hmmmm बोल ..

मी तुला एकदा विचारलं होतं, माझा एक मित्राबद्दल

तो एका मुलीला भेटला, जी अगदी त्याच्या कल्पनेतल्या मुली सारखीच होती, सारखी म्हणण्यापेक्षा त्यापेक्षा जास्त.

हो.... मला आठवतंय......

तर मी तुला त्यात दोन गोष्टी खोट्या बोललो होतो,

एक तर तो मुलगा मी होतो आणि .. ती मुलगी .... मुलगी . दुसरी कुणी नाही तर तुच आहेस....

आणि तू मला खूप जास्त आवडते ...... I LOVE YOU

आणि हे बोलून मी शांत झालो,

हे आवडणं फक्त Hi, Hello, Morning आणि good night पुरता नाहीच, किंवा काही अपेक्षाने भरलेलं, स्वार्थाने माखलेलं, काही बिनसल्या वर द्वेष पात्र नाहीच हे सर्व मी तिला सांगणार होतो पण पण .... असो

मी तिच्या साठी प्रार्थना केली होती, तिच्या चेहऱ्यावरच हास्य खंडित नको व्हायला.

आणि ती हसत होती, माझ्या बोलून झालं होतं या पुढे बोलणं मला कठीण होतं,

ती खूप special होती माझ्या साठी  हे मी  तिला सांगण्यात अपयशी झालो होतो. असच मला वाटत होतं,  मी तिला सपूर्ण नाही सांगू शकलो होतो. पण तिला सांगितलं होतं हे खूप महत्वाचं होतं. आता मी मोकळा झाला होतो. मनात खूप दडपण घेऊन मी वावरत  होतो. आज ते बाहेर आलं होतं. सर्व नाही पण बाहेर आलं होतं.

मी सोबत आणलेलं एक gift तिला सोपवलं आणि आम्ही परत निघालो, **तिला मी काही विचारलं नव्हतं,  अर्थात तिला मी काही विचारणार नव्हतोच, कारण  इथे विचारणं नाही तर सांगणं महत्वाचं होतं.** आणि मी तिला सांगितलं होतं.

आम्ही शांत अगदी शांत येत होतो. वाटेत  काहीच बोलणं नव्हतं,  पण वातावरणातला तणाव मात्र कमी झाला होता.

मी तिला एक Gift दिलं होतं.  Gift द्यायचं काय हा मोठा प्रश्न होता. ‘पुस्तक’ द्यावं अस मला जरी वाटत असलं तरी मी पहिल्यांदा मुलीला Gift देत होतो. मग पुस्तक देणं @@@@@,

ती हि म्हणेल काय पोरगं आहे हे,  मुलीला Gift दिलं ते हि पुस्तक. म्हणून मी तिला दुसरं काही तरी द्यायचं ठरवलं.

खूप विचार केल्यानंतर ठरवलं. Gift असं असलं पाहिजे जे विसरणं अशक्य असलं पाहिजे.

अशीच एक वस्तू मी तिला दिली होती,  जी तिला स्वताला खूप आवडते. आणि ती त्या वस्तूला विसरणे निव्वळ अशक्य होतं. कारण त्या वस्तुत ती स्वताच होती.

आणि स्वताला कुणी विसरत नाहीच कधी .. कधीच नाही.

जर मी बोलू नाही शकलो तर एक पर्याय म्हणून मी लिहून तिला द्यायचं ठरवलं होतं. आणि ते मी तिला त्या Gift मध्ये टाकून दिलं होतं.

आम्ही जात होतो. माझ्या मनात आता काहीच नव्हतं. तिला काय सांगायचं, काय बोलायचं .. काहीच नाही..

**अगदी पाण्याने पूर्ण भरलेला पेला रिकामा करावा तसाच मी रिकामा झालो होतो.** मला ते लिहिलेलं आठवत होतं. जे मी तिला सांगु शकलो नव्हतो. मला एक एक शब्द आठवत होता....

## who are you??

माझ्या आयुष्यातलं सर्वात सुंदर, सोज्वळ, प्रेमळ, कोमळ, पावित्र्याने पुरे-पुरे भरलेलं सत्य. जे आधी फक्त कल्पनेत, स्वप्नात आणि फार तर फार वहीतल्या पानांवर होतं. ते कल्पनेतलं, स्वप्नातलं सत्य म्हणून माझ्या समोर प्रकट आहेस तू ...

तुला कितीही शब्दात सांगण्याचा मी प्रयत्न केला तरी तो प्रयत्न अपूर्णच असणार

कारण, ” तू शब्दात व्यक्त होणारी नाहीसच “

जगातली सर्वांना जमणारी भाषा, ज्यात शब्दांचा समावेश नाही, शब्दांचा आधार नसतो. जी भाषा एक मनातून निघून दुसऱ्या मनाला जाऊन पोहचते. अगदी कशाचाच आधार न घेता.

अशी जगनिर्मात्याची भाषा म्हणजे मूक भाषा, अशा भाषेतच तुला व्यक्त करता येईल.

प्रत्येकदा काही बोलण्यासाठी शब्दांची, भाषेची गरज असतेच असं नाही. मूक भाषा, मनाची भाषा ... न बोलताच समोरच्याला कळते.

ती तू आहेस .. !!!!!!!!

माझ्या कल्पनेतलं व्यक्तिमत्व आहेस तु..

“जीच्या नुसत्या प्रार्थनेने एखाद्याचं दुख: कमी होतं”

“जिला पाहिल्याने मनाच्या गाभाऱ्यातून आनंदाचा, **सात्विक आनंदाचा** वर्षाव होतो”.

“जिच्या चेहऱ्यावरचं ते हास्य, जे कृत्रिम नाहीच असं ते हास्य पाहून चेहऱ्यावर आपोआप आनंद तयार होतो, जरी मनात कितीही दुख असलं तरी. ”

“जिच्या तोंडून निघणारा शब्द, ज्यात शब्दांचं हास्य मिसळलेलं असतं, जे सहजासहजी जमत नाही प्रत्येकाला.. ”

ते हास्ययुक्त शब्द ऐकून कानाला आणि त्या सोबत मनालासुद्धा तृप्तीची जाणीव होते.

तुझ्या त्या कायम दुसऱ्याच्या विचार करण्याच्या गुणाला, इतरांच्या काळजीने मन कासावीस होण्याला काय म्हणावं. (त्या काळजीत एक नाव माझं हि सामील व्हावं) अशा त्या काळजीला काय म्हणावं.

**आयुष्यात एक व्यक्ती हवा, ज्या साठी निस्वार्थ भावनेने काहीतरी मागावसं वाटतं, जिच्या आनंदात कधीच कमी नको. दुखाचा स्पर्शहि तिला नको... गालातल्या तिच्या हास्यला कधीच शेवटचा थांबा नको अगदी झोपेतसुद्धा. जिच्या साध्या स्पर्शाने वेदनांनासुद्धा सुखाची अनुभूती होते.**

कुठे तरी ऐकलं होतं " मनुष्य एक क्षणसुद्धा अपेक्षेविरहित राहू शकत नाही. परंतु ...

**तु माझ्यासमोर सोबत, विचारात असताना मला कोणत्या अपेक्षा उरतच नाही .. त्या अपेक्षेरहित क्षणाचा आंनद मी वेळोवेळी अनुभव घेत आहेच.**

जेव्हा तुला पहिल्यांदा पाहिलं त्या वेळीसुद्धा आणि आता या क्षणी तुझ्याशी बोलताना सुद्धा त्याचा अनुभव मी हेऊ शकत आहे.

हो, मात्र एक गोष्ट खरी आहे,

"तुझ्या सुखाने मी सुखावतो, तुझ्या दुखा:ने दुखावतो, तुझ्या आनंदात आनंदी होतो, तुझ्या निराशेत निराश ... "

तुझ्या प्रत्येक गोष्टीचा माझ्यावर फरक पडतो,

हे सत्य मान्य करायला मला संकोच वाटत नाही.

माझ्या मनातून निघणारी प्रार्थना मग ती कोणतीही असो ती तुझ्या शिवाय पूर्ण होत नाही त्या प्रत्येक प्रार्थनेत तूच असते.

कदाचित तुला वाटेल यात खूप काही जास्त लिहलंय परंतु हे कमीच आहे, तुझ्याबद्दल लिहायला, सांगायला एक पुस्तक हि कमी होईल.

परंतु सध्या इथेच थांबतो परंतु यात लिहलेला प्रत्येक शब्द हा खरा आहे.

तुझे उत्तर काहीहि असो, तुला मनातलं सांगणं मला महत्वाचं वाटलं.

ते काहीही असो तो माझ्या सर्वोच्य आनंदा पैकी तो एक असेल,

तू मला आवडणं हे 'हो किंवा नाही' याच्या पलीकडे आहे. 'हो अथवा नाही' याचा माझ्या आवडीवर अजिबात फरक पडणार नाही.

**कारण यापुढे तू कायम माझ्यातच असणार आहेस, माझ्या मनात, माझ्या विचारात, माझ्या कामात आणि कर्तुत्वातसुद्धा.**

तू माझ्या स्मरणात असणार आहेस, मी जिथे जिथे जाईल तिथे तिथे तू माझ्यात असणार, मी जे जे करेल त्या प्रत्येक कामात तू असणार आहे. म्हणून हे सर्व तुझ्या 'हो अथवा नाही' च्या पलीकडे आहे.

सर्वात शेवटी हेच सांगेन.

BE HAPPY...

@@@@@@

हे पूर्ण तिला दिलेलं letter आठवत, मी तिला तिच्या रूमपर्यंत सोडलं होतं. मी आज अगदी मोकळा होऊन जात होतो. माझं सर्व दडपण कमी करून मी जात होतो.

मी तिला तिचं उत्तर विचारलं नव्हतं.

गाडी पार्क केली, आता दोघांना जायचं होतं. तिला तिच्या रूमला आणि मला माझ्या.

ती तिच्या रस्त्याला जाऊ लागली आणि मी माझ्या. दोघांच्या रूम चे रस्ते विरुद्ध दिशेने होते, ती जात होती मी हि जात होतो...... रस्ते जरी वेगळे असले तरी ध्येय एक असायला पाहिजे होतं, कदाचीत असेल हि.

**“ती जात आहे हे जरी सत्य असलं तरी ते अंतिम सत्य नव्हतंच. ”**

**कारण, हा शेवट नव्हताच....**

पण मनात असंख्य विचार सुरु होते...

हे सर्व सुंदर होतं आणि हेच सुंदर अनुभव सोबत घेऊन मी जात होतो.

तिच्या सोबतचा एक-एक क्षण हा माझ्या साठीचा “आनंदी आणि अविस्मरणीय” होता, आणि तो तसाच कायम राहणार होता. आता हि आणि या पुढेसुद्धा, अगदी ताजे, कधी न विसरणारे, आणि हो कायम आनंद देणारे तो हि अगदी मनापासून, हृदयाच्या खोल भागापासून, जिथून आनंदाची सुरुवात होते ..

हे सर्व आठवत मी जात होतो आणि तिला मनात घेऊन मी जात होतो.....

तिच्या उत्तराची वाट न पाहताच, कारण तिच्या त्या हास्याने मला उत्तर न घेताच जाण्यासाठीचा संकेत दिला होता. ते हास्य .. त्या हास्याबद्दल काय सांगू... ते हेच हास्य होतं जे प्रत्येक दुखावर आनंदाचा वर्षाव करणारं होतं. त्या क्षणाचा आनंद व्यक्त करण्यासाठी माझ्या जवळचे शब्द सुधा अर्थपूर्ण नव्हते.

**"पण मला तिच्या जाण्याचं दुख नव्हतं, ते जाणं, जाणं नव्हतं.**

**कारण, "जसं सूर्य संपूर्ण दिवस प्रकाश देऊन सर्वांना जीवन देतो आणि संध्याकाळी अस्ताला जातो ... मात्र ते जाणं कायमचं नसतच, तर ते जाणं, सकाळी पुन्हा येण्यासाठीचं असतं"**

**अगदी तसंच तिचं जाणं होतं...... परत येण्यासाठी ...**

**मात्र ती जरी जात असली तरी तिच्यातले सर्व गुण मी स्मरणात घेऊन जात होतो. तिची देवा वरील श्रद्धा आणि त्या श्रद्धेमुळे तयार झालेलं तिचं व्यक्तिमत्व आणि सर्वात महत्वाचं म्हणजे <u>'तिला '</u> मी माझ्यात घेऊन जात होतो. "**

**" माझ्यातलं अपूर्णत्वला पुर्णत्वाचं रूप देत.**

**स्वप्नांना सत्याचं रूप देत ..... "**

**("कोणत्याही कामात श्रद्धा असलीच पाहिजे, ते काम यशस्वी रित्या पूर्ण होण्याची शक्यता जास्त असते आणि इथे श्रद्धा जग निर्मात्यावर, देवावर होती ... मग यश निश्चितच होतं. ")**

(समाप्त  नाही   .....  कारण प्रेमाला अंत नसतो)

BE HAPPY@

कथेचा पुढील भाग जाणून घेण्यासाठी संपर्क साधा

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.